# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

## परिपत्रक

२५/२०२२

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील कलम ११५ (१) नुसार शासकीय कर्मचारी हा, सेवेत कायम झाल्यानंतर नामनिर्देशन करून त्याद्वारे नियम १११ अनुसार अनुज्ञेय होणारे (सेवानिवृत्ती उपदान/मृत्यू उपदान) मिळण्याचा हक्क त्यांच्या कुटूंबीतील एक किंवा अधिक सदस्यांना प्रदान करू शकतो. त्याअनुषंगाने कर्मचा(याने नामनिर्देशन सादर करणे आवश्यक आहे. जर कर्मचा-याने नामनिर्देशन केले नसेल किंवा ते अद्यावत केलेले नसेल तर सेवानिवृत्ती उपदान / मृत्यू उपदान, रजा रोखीकरण, अनुकंपा नियुक्ती किंवा इतर सेवाविषयक, वित्तविषयक लाभ मिळण्याच्या बाबतीत अडचणी निर्माण होऊ शकतात. परिपत्रक १७/२०२२, दि. २१ एप्रिल, २०२२ नुसार अद्यापी काही प्रशासकीय सेवक, अधिकारी व शिक्षक यांनी नामानिर्देशन सादर केलेले नाही.

**परिपत्रक :-**

या परिपत्रकाद्वारे विद्यापीठातील शिक्षकेत्तर कर्मचा-यांना कळविण्यात येते की, त्यांनी विहित नमुन्यातील नामनिर्देशन सादर करावेत. जेणेकरून सेवानिवृत्ती उपदान / मृत्यू उपदान, रजा रोखीकरण, अनुकंपा नियुक्ती किंवा इतर सेवाविषयक, वित्तविषयक लाभ मिळण्याच्या बाबतीत अडचणी निर्माण होणार नाहीत. सदर नामनिर्देशन सादर करताना -

१. विहित नमुन्यातील नामनिर्देशन सादर करावे. विहित नमूना विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे.

२. नामनिर्देशित व्यक्तिच्या ओळखीचा / जन्म तारखेचा पुरावा म्हणून पुर्ण जन्मतारखेची नोंद असलेल्या कोणत्याही दोन कागदपत्रांच्या छायांकित प्रती सोबत जोडाव्यात.

३. नामनिर्देशन नमुन्यातील सर्व माहिती बिनचुक, सुवाच्च हस्ताक्षरात भरावी व दोन सहका-यांची साक्षीदार म्हणून स्वाक्षरी घ्यावी.

४. परिपत्रक १७/२०२२, दि. २१ एप्रिल, २०२२ नुसार अद्याप पर्यंत ज्या प्रशासकीय सेवक, अधिकारी व शिक्षक यांनी नामानिर्देशन सादर केलेले नाही त्यांनी सदरची सर्व माहिती गुरूवार, दिनांक ३० जून, २०२२ पर्यंत या कार्यालयास सादर करावी.

सर्व अधिविभागप्रमुख व प्रशासकीय विभागप्रमुख यांना कळविण्यात येते की, त्यांनी सदर परिपत्रक त्यांच्या अधिनस्थ शिक्षक / अधिकारी / कर्मचा-यांच्या निदर्शनास आणुन द्यावे.

प्र-कुलसचिव

**जा.क्र. आस्थापना/ 1366**

**दिनाक :- 20 JUN 2022**

**प्रति,**

**१) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक,समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व सेवक**

**२) मा.कुलगुरू,मा.प्र-कुलगुरू, मा. कुलसचिव, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास**

**३) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.**

**- यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठभ्.**